लोकमत

4 APR 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**'शिवसंदेश'चे पुनरुज्जीवन : ब्लॉग, ई-बुलेटिन, एसयुके-इन न्यूजची सुरुवात**


# शिवाजी विद्यापीठाचे 'सोशल' पाऊल

संतोष मिठारी • कोल्हापूर

कॅम्पसवरील शैक्षणिक, संशोधन, आदी क्षेत्रांतील घटना, कामगिरीची माहिती जगभरात जावी, या उद्देशाने शिवाजी विद्यापीठाने सोशल मीडियाच्या वापराच्या दिशेने पाऊल टाकले आहे. यात विद्यापीठाने युनिशिवसंदेश ब्लॉग, एसयुके-इन न्यूजची सुरुवात केली आहे. शिवाय गेल्या दीड वर्षापासून बंद असलेले ई-बुलेटिन 'शिवसंदेश' हे अद्ययावत करुन त्याचे पुनरुज्जीवन केले आहे.

विद्यापीठाने गेल्या दीड वर्षापूर्वी संकेतस्थळ अद्ययावत केले; पण विद्यापीठाचे 'शिवसंदेश' हे ई-बुलेटिन अद्ययावत केले नव्हते. कॅम्पसमधील शैक्षणिक, संशोधन, प्रशासकीय विभाग, आदी क्षेत्रांतील घटना, कामगिरीची माहिती देण्यासाठी दर महिन्याला प्रसिद्ध होणारे इंग्रजी माध्यमातील 'शिवसंदेश' २००५ मध्ये सुरु केले. मात्र, ई-बुलेटिनच्या कामाबाबतची समन्वय समितीच्या कामकाजाची पद्धती, विद्यापीठ विविध अधिविभाग आणि संलग्नित महाविद्यालयांची उदासीनता 'शिवसंदेश'च्या नियमित अद्ययावतीकरणाला अडथळा ठरली.

प्रशासनाने शिवसंदेश अद्ययावत करण्यासाठी संपादकीय मंडळ बदलले. या नव्या मंडळाने जानेवारी व फेब्रुवारी २०१६ चा अंक अद्ययावत केला आहे. ई-बुलेटिनसह अन्य सोशल मीडियाच्या वापराच्या दिशेने विद्यापीठाचे पाऊल पडले. यात जनसंपर्क कक्षाला दोन वर्षे पूर्ण झाल्याबद्दल शिवसंदेश ब्लॉग १ मार्चपासून सुरू केला आहे. याद्वारे विद्यापीठातील विविध उपक्रम, कार्यक्रमांची माहिती मराठीतून दिली जाते. यात विद्यार्थ्यांसह समाजातील विविध घटकांना विद्यापीठाबाबतच्या आपल्या सूचना, मते मांडता येणार आहेत. विद्यापीठातील अधिकाऱ्यांनी फेब्रुवारीमध्ये दक्षिण कोरियाचा दौरा केला. येथे शिवाजी विद्यापीठाच्या माजी विद्यार्थ्यांनी विद्यापीठातील घडामोडींची माहिती देणारी लिंक विकसित करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली होती. त्यानुसार 'एसयुके-इन न्यूज' ही लिंक विकसित केली आहे. यात कोल्हापुरातील वर्तमानपत्रांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या विद्यापीठाशी संबंधित बातम्यांची कात्रणे स्कॅनिंग करून अपलोड केली जातात. त्यामुळे परदेशातील विद्यार्थ्यांपर्यंत विद्यापीठातील उपक्रम, कार्यक्रमांची माहिती मराठीतून रोज पोहोचत आहे. ऑनलाईन व सोशल मीडियाचा वापर करून इंग्लिश आणि मराठीतून विविध उपक्रम, घडामोडींची माहिती जगभरात पोहोचविण्याचा प्रयत्न विद्यापीठाला नवी ओळख देत आहे.







## फेसबुक पेज सुरू करण्याचा विचार

शिवाजी विद्यापीठाचे विद्यार्थी जगभरात विविध ठिकाणी कार्यरत आहेत. त्यांना विद्यापीठातील उपक्रम, घडामोडींची माहिती मिळावी, यासाठी ई-बुलेटिन, ब्लॉग व एसयुके-इन न्यूजची सुरुवात केली असल्याचे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी सांगितले. ते म्हणाले, या उपक्रमाद्वारे विद्यापीठाने सोशल मीडियाच्या वापराच्या दिशेने पाऊल टाकले आहे. ब्लॉगद्वारे विद्यार्थी, समाजातील विविध घटकांना विद्यापीठाशी संवाद साधता येईल. विद्यापीठाचे अधिकृत फेसबुक पेज सुरु करण्याचा विचार सुरु आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Times of India 04 APR 2016

# Shivaji University signs MoU with C-DAC

**Kolhapur:** The Centre for Development of Advanced Computing (C-DAC), Pune on Friday signed a memorandum of understanding (MoU) with the Shivaji University, Kolhapur.

Under the agreement, the two institutions will exchange information and communication technology. "The MoU is a milestone for both institutions and will help strengthen educational and IT technology cooperation," the director general of C-DAC Rajat Moona said.

The MoU will bring the two institutions together to work closely on big data analysis, free and open source data mining embedded systems, wireless sensor network, Very Large Scale Integration (VLSI) design, software engineering and multilingual technologies.

The MoU will also help institutes expose students to cutting-edge skills. Apart from this, seminars, workshops and training sessions on innovation and research can be arranged in the future. Under the MoU, experts from C-DAC can be appointed in the university while last year's computer department students can also get an internship at C-DAC.

"We have been working in the IT field for the last 28 years. C-DAC has played a crucial role in making India an IT superpower. We are happy to be associated with the university, which has adopted open-source learning platforms," Moona said after the MoU signing ceremony. TNN

लोकमत  4 APR 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात ९ मेपासून प्रवेश परीक्षा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विविध पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी दि. ९ मेपासून प्रवेश परीक्षा होणार आहे. त्यासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची प्रक्रिया दोन दिवसांपासून सुरु झाली आहे.

त्यात दूरशिक्षण विभागाच्या एमबीए., एमबीए (इक्झिक्युटिव्ह), बीजेसी., एमजेसी., एम. ए. मास कम्युनिकेशन अभ्यासक्रमाच्या ऑफलाईन प्रवेश परीक्षा दि. ९ मे रोजी होतील. यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट कोर्सअंतर्गत एमएसडब्ल्यू, एमआरएस, एमसीए, एम. टेक या अभ्यासक्रमांची प्रवेश परीक्षा दि. १० मे रोजी ऑफलाईन पद्धतीने होणार आहे. इलेक्ट्रॉनिक्स, कॉम्प्युटर सायन्स, एमसीए (सायन्स कॉमर्स), ए. एस्सी मॅथेमॅटिक्स, आदींची प्रवेश परीक्षा ऑफलाईन पद्धतीने दि. ११ मे रोजी होणार आहे. बी. लिब. अँण्ड इन्फॉर्मेशन सायन्स, एम. ए., एम. एस्सी., आदींच्या दि. १२ मे रोजी, तर बायो केमिस्ट्री, इन्व्हायर्न्मेंटल बायोटेक्नॉलॉजी, एम. एस्सी. झूलॉजी, बायोटेक्नॉलॉजी, आदी अभ्यासक्रमाची परीक्षा दि. १३ मे रोजी होणार आहे. या परीक्षांसाठी (online.shivajiuniversity.in) या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करावे लागतील. (प्रतिनिधी)

पुढारी
4 APR 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अभियांत्रिकीच्या परीक्षेत चुकीचा प्रश्न; प्राध्यापकास २५ हजार दंड

## विद्यापीठाची कारवाई; कामचुकारांच्या कारभारावर येणार अंकुश

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

अभियांत्रिकीच्या द्वितीय वर्ष सिव्हिल इंजिनिअरिंग परीक्षेत अभ्यासक्रमाबाहेरील प्रश्न काढल्याप्रकरणी परीक्षा प्रमाद समितीने संबंधित प्राध्यापकास २५ हजार रुपयांचा दंड केला असून एक वर्ष परीक्षा कामकाजापासून बाजूला ठेवले आहे. विद्यापीठाने प्रथमच एवढी मोठी कारवाई केल्याने कामचुकार प्राध्यापकांच्या कारभारावर अंकुश येणार आहे.



शिवाजी विद्यापीठातून...

ऑक्टोबर-नोव्हेंबर २०१५ मध्ये विद्यापीठाच्या वतीने विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा घेण्यात आल्या. अभियांत्रिकी द्वितीय वर्ष सिव्हिलच्या इंजिनिअरिंगमधील 'बिल्डिंग कन्स्ट्रक्शन अँड ड्राईंग' च्या प्रश्नपत्रिकेत २६ गुणांचा अभ्यासक्रमाबाहेरील प्रश्न विचारण्यात आला होता. परीक्षा विभागाने हे प्रकरण परीक्षा प्रमाद समिती समोर ठेवले.

समितीने त्या प्राध्यापकावर दंडाची कारवाई केली आहे. जे प्राध्यापक कामचुकारपणा करतात. परीक्षा कामकाजात सहभागी होत नाहीत, त्यांना पहिली वेळ समजून परीक्षा प्रमाद समितीने कडक शब्दात समज दिली आहे. यापुढे असे प्रकार आढळल्यास कडक शिक्षा करण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
लोकमत 4 APR 2016

# पेपर सेटरला विद्यापीठाचा दंड

**कोल्हापूर** : डिसेंबर २०१५ मध्ये स्थापत्यशास्त्र अभियांत्रिकीतील 'बिल्डिंग कन्स्ट्रक्शन अँड ड्रॉईंग' या विषयाच्या प्रश्नपत्रिकेत अभ्यासक्रमाबाहेरील प्रश्न पडला होता. संबंधित पेपर सेटरला (प्रश्न नियोजक) २५ हजार रुपयांचा दंड आणि एक वर्ष परीक्षेच्या कामकाजातून निलंबित करण्याची कारवाई शिवाजी विद्यापीठ परीक्षा प्रमाद समितीने केली असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

विद्यापीठाच्या परीक्षा प्रमाद समितीची बैठक मार्चच्या अखेरच्या आठवड्यात झाली. डिसेंबर २०१५ मध्ये अभियांत्रिकी विद्याशाखेच्या द्वितीय वर्षातील 'बिल्डिंग कन्स्ट्रक्शन अँड ड्रॉईंग' या विषयाच्या प्रश्नपत्रिकेत अभ्यासक्रमाबाहेरील प्रश्न पडला होता. त्यामुळे विद्यार्थ्यांना मनस्ताप झाला.प्रश्नपत्रिकेतील संबंधित चूक पेपर सेटरने मान्य केली होती. तसेच हे प्रकरण विद्यापीठाच्या परीक्षा प्रमाद समितीसमोर गेले. यावर समितीने या सर्व बाबींचा विचार करून संबंधित पेपर सेटरला दंड केला आहे. त्यासह गुणपत्रिकेत चुकीचे गुण भरणाऱ्यांना दोन ते पाच हजार रुपयांचा दंड आणि लेखी समज दिली असल्याची माहिती सूत्रांनी दिली. (प्रतिनिधी)